# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २५३ वा ❑ बुधवार दि.०३ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## विजयने शून्यातून विश्व निर्माण केले

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

शून्यातून विश्व निर्माण करणे किंवा मेहनतीने उंची गाठणे या वाक्यांचा अर्थ असा आहे की एखाद्या व्यक्तीने कठोर परिश्रम, चिकाटी आणि समर्पणाने यश मिळवले आहे. हे केवळ भौतिक उंचीबद्दल नाही, तर यश, प्रतिष्ठा आणि मोठे उद्दिष्ट साध्य करण्याबद्दल आहे. अनेक उदाहरणे आहेत, जसे की रतन टाटा किंवा डॉ. जितेंद्र सिंह, ज्यांनी आपल्या मेहनतीने मोठे यश मिळवले.आज मी अशाच एका फेरीवाल्यांची गोष्ट सांगणार आहे. एका फेरीवाल्याने जिद्द,परिश्रम,त्याग,निष्ठा,विश्वास आणि समर्पणातून फार मोठी उंची गाठली.त्या फिरवाल्याचे नाव विजय डबरे.त्यांची व माझी भेट ३० वर्षानंतर झाली. शून्यातून विश्व निर्माण केले.

असे आपण अनेकदा म्हणत असतो.‘‘शून्यातून विश्व निर्माण केले‘‘ या वाक्याचे दोन मुख्य अर्थ आहेत: एक धार्मिक आणि एक लाक्षणिक, जे एखाद्या व्यक्तीच्या प्रयत्नांना सूचित करते. धार्मिकदृष्ट्या, याचा अर्थ क्रिएशिओ एक्स निहिलो ( ) आहे, ज्यामध्ये देव शून्यातून सर्वकाही निर्माण करतो असे मानले जाते. लाक्षणिकदृष्ट्या, याचा अर्थ असा आहे की आर्थिक पाठबळ किंवा कोणतीही पूर्वस्थिती नसतानाही, कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीने स्वतःचे यश मिळवणे.

धार्मिक दृष्ट्या अर्थ मला इथे सांगायचे नाही.एखाद्या व्यक्तीच्या यशोगाथेसाठी मला या म्हणीचा ,या वाक्य प्रयोगाचा वापर करायचा आहे. सुरुवातीला कोणतीही आर्थिक मदत किंवा संसाधने नसतानाही, कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर खूप मोठे यश मिळवता येते. अनेक उद्योजक, कार्यकर्ते आणि यशस्वी व्यक्तींच्या आपल्या जिद्दीच्या ,मेहनतीच्या बळावर खूप मोठी उंची गाठलेली आहे.ज्यांनी शून्यातून आपले साम्राज्य उभे केले. अशा अनेक कहाण्या आपल्या समोर आहेत.आशीच एक कहाणी विजय दबडे यांची आहे.

विजय दबडे यांनी शून्यातून विश्व निर्माण केले.उच्च शिक्षण घेऊनही त्यांना नोकरी मिळाली नाही..अनेक स्पर्धा परीक्षा दिल्या...उत्तीर्ण देखील झाले.मात्र योग नसल्याने त्यांना नोकरी मिळाली नाही..नोकरी अभावी, सुरुवातीचे त्यांचे दिवस अत्यंत हलाकीचे होते. घरची परिस्थिती हलाकीची,जेमतेम असल्याने रोजगाराअभावी दैनिक जीवन जगणे कठीण होते.मात्र कष्ट,मेहनत करण्याची जिद्द असल्याने त्यांनी सरतेशेवटी ढक्कल बंडीवर आंबे विकण्याचा व्यवसाय सराफ लाइन व भाजी बाजार वर्धा येथे सुरू केला.हा व्यवसाय करताना त्यांच्या समोर अनेक अडचणी,समस्या होत्या..बाजारात जागा मिळणे अशक्य..रस्त्यावर

ढक्कल बंडीवर व्यवसाय , फुटपाथवर एखादी वस्तू विक्रीचा व्यवसाय करणे,हे खूप मोठे आव्हान! इकडून तिकडे..तिकडून इकडे ...सतत फेरी लावणे..जिथे जागा मिळाली तिथे दिवस भर उभे राहणे, विक्री करणे...हा सर्व प्रकार खूप कठीण..त्यातच, दुकान दार,रस्त्यावर चालणारे,वाहन चालक फेरीवाल्यांना शिव्या देतात...या सर्व परिस्थितीत फुटपाथवर दिवस भर विक्री करणे,हे काठीनच..त्यातच नगर प्रशासन पोलिस वाले..यांची दादागिरी काही वेगळीच... प्रत्येक जण फेरीवाल्यांकडून सामान खरेदी करतात. मात्र फेरीवाल्यांकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोनआणि त्याला मुद्दाम घातले गेलेले खतपाणी. शहरातील बहुतांश लोक या फेरीवाल्यांकडूनच खरेदी करतात. भाजीपासून पाणीपुरीच्या ठेल्यापर्यंत आणि अगरबत्त्यांपासून कपडय़ांपर्यंत सर्व वस्तू या विक्रेत्यांकडे तुलनेने स्वस्त दरात उपलब्ध असतात. संध्याकाळी कामावरून घरी परतताना रस्त्यावरच्या विक्रेत्यांकडूनच सामान घेतले जाते. लोकांनी खरेदी केली नाही तर विक्रेते कशाला स्वत:चा पसारा मांडतील? मात्र विक्रेते ही शहरातील लोकांची गरज आहे हे लक्षात घ्यायला पाहिजे...अशा सर्व बिकट परिस्थित विजय यांनी हार न मानता आपला व्यवसाय सतत सुरू ठेवला...याच व्यवसायातून त्यांनी मुलांना शिक्षित केले..त्यांना दोन मुल. दोन्ही मुलांना उच्च शिक्षण दिलं...पुढे त्यांनी आपल्या आंबे विक्रीचा व्यवसाय बंद केला...चार पैसे जमा केले..याच जमा पैशातून त्यांनी काही वर्षे किराणा दुकान देखील चालविले..मेहनत, काबाडकष्ट करत पैसे जमा करत त्यांनी पुढे कॅटरिंगचा व्यवसाय सुरू केला... आठ दहा वर्ष हा व्यवसाय सुरू ठेवला...याच पैशातून त्यांनी मुलांना उच्च शिक्षण दिले...दोन्ही मुलं अभियंता झाले..आज त्यांची दोन्ही मूल विदेशात मोठ्या पदावर कार्यरत आहे. कॅटरिंगच्या व्यवसायातून त्यांना मॅरेज हॉलची कल्पना सुचली. आणि ठरल्याप्रमाणे वर्धा यवतमाळ बायपास वर त्यांनी साडेबारा हजार फूट जागा २०१० मध्ये खरेदी केली..जिद्द परिश्रम,निष्ठा,आपल्या कामाप्रती समर्पण यातून त्यांना एकेक मार्ग सापडत गेला..या भव्य दिव्य जागेवर त्यांनी नावाचे मॅरेज भव्यदिव्य.

हॉल बनविले..

मॅरेज हॉलची रचना भव्य आणि आकर्षक असुन हॉल भव्य समारंभासाठी योग्य आहे. आणि यात खास सजावट, मोठी जागा आणि इतर सुविधा उपलब्ध आहे , आरामदायी वातानुकूलित आहे.जेणेकरून ते खास आणि अविस्मरणीय वाटावे.

हा हॉल तीन मजली असून सर्वात वरच्या हॉल मध्ये वऱ्हाड यांना थांबण्यासाठी सर्व सोयींनी युक्त अशा रूम्स बनविण्यात आलेले आहेत. दुसऱ्या माळ्यावर लग्न हॉल..तर खालच्या माळ्यावर रिसेप्शन हॉल..हे सर्व करत असताना त्यांनी कधीही स्वतःला कमी लेखले नाही..जीवन जगत असताना समस्या,अडीअडचणी येतात.यातून काही लोक खचून जातात...काही लोक माघारी घेतात.मात्र काही लोग सर्व प्रकारच्या परिस्थिती वर मात करत आपल्या निश्चित ध्येयापर्यंत पोहोचतात.कोणतेही कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी समर्पण महत्त्वाचे आहे, कारण ते ध्येयावर लक्ष केंद्रित करण्यास आणि त्यासाठी आवश्यक परिश्रम करण्यास मदत करते. समर्पण म्हणजे केवळ वेळ देणे नव्हे, तर ध्येय साध्य करण्यासाठी स्वतःला पूर्णपणे वचनबद्ध करणे, सातत्य ठेवणे आणि अडचणी आल्या तरीही प्रयत्न करत राहायला पाहिजे.

यशस्वी होण्यासाठी सर्वात महत्वाचा गुण म्हणजे यशस्वी व्हायचे असेल तर पहिल्यांदा तुमच्या जवळ तुमचे लक्ष्य असणे आवश्यक आहे. लक्ष्य नसणे म्हणजे हवेत बाण मारण्यासारखे आहे. रामायणात जसे रामाजवळ रावणाला मारण्याचे लक्ष्य होते व ते मिळवण्यासाठी मग त्या मार्गावर अनेक संकटे पार करत जावे लागले मग लक्ष्य प्राप्त झाले, तसेच लक्ष्य यशस्वी होण्यासाठी तुमच्याजवळ असणे आवश्यक आहे. लक्ष्य निर्धारित झाल्यावर मग तुम्ही ठरवू शकता की कोणत्या मार्गाने तिथे जावे तेही ने आपल्या लक्षय्यपर्यंत पोहचावे.‘‘ ‘‘ म्हणजे कधीही हार न मानण्याची वृत्ती होय, ज्यामध्ये अपयश आले तरीही प्रयत्न करत राहण्याची जिद्द आणि चिकाटी असते. ही अशी मानसिकताच आहे जी आपल्याला अडचणींवर मात करण्यास, आपल्या ध्येयांवर लक्ष केंद्रित करण्यास आणि आंतरिक शक्तीने पुढे जात राहण्यास मदत करते.



हीच खऱ्या यशस्वी होण्यासाठीची गुरुकिल्ली.

विजय यांनी आपल्या समोर लक्ष ठेवले. सर्व प्रकारच्या परिस्थिती वर मात केली..

विजय यांच्या हलाकीच्या परिस्थितीत त्यांच्या सुविद्य पत्नी सौ अलका विजय दबडे यांनी त्यांना साथ दिली.सावली बनून त्या त्यांच्या सोबत खांद्याला खांदा लावून त्यांना पदोपदी मदत केली.पतीच्या विश्वासाला तडा न जावू देता त्यांनी पदोपदी मदत केली.जेव्हा इतर कोणीही विश्वास ठेवत नसेल, तेव्हा पत्नीने दाखवलेला विश्वास आणि तिला दिलेला पाठिंबा महत्त्वाचा असतो.पत्नीचा आत्मविश्वास आणि समजूतदारपणा पतीला आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि यश मिळवण्यासाठी प्रोत्साहन देतो.विजय यांच्या पत्नीने घरची जबाबदारी सांभाळत मुलांचे संगोपन करत विजय यांना सतत प्रोत्साहन दिले.त्यांच्या या अतुलनीय विश्वासाने विजय यांनी प्रत्येक क्षेत्रात विजय मिळविला. विजय यांची पत्नी त्या भव्यदिव्य बनविण्यात आलेल्या च्या संचालिका आहेत. परिश्रमातून मातीचे देखील सोने होते. कठोर परिश्रम केल्यास साध्या गोष्टींमध्येही मूल्य निर्माण करता येते. शेतकरी मातीला कष्ट देऊन पिकाच्या रूपात सोने (उत्पन्न) मिळवतो, त्याचप्रमाणे एखादा कलाकार कलेतून आणि कारागीर कौशल्यातून मेहनतीचे सोने तयार करतो. या वाक्यातून परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित होते. विजय यांनी सतत मेहनत करून आज मोठी उंची गाठली आहे.त्यांच्या मेहनतीला मनापासून शुभेच्छा!!

# राममंदिर झाले, आता राष्ट्रमंदिराची उभारणी-सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

## आदित्य प्रतिष्ठानच्या वतीने कृतज्ञता पुरस्कार



**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – विश्वकल्याणाची पताका फडकविणारे श्रीराममंदिर उभे राहिले. आता पूर्वीपेक्षा अधिक भव्य, सामर्थ्यसंपन्न आणि सुंदर राष्ट्रमंदिर उभे करायचे आहे, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केला.

कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित, आदित्य प्रतिष्ठान प्रस्तुत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षानिमित्त कृतज्ञता सोहळ्यात सरसंघचालक बोलत होते. यावेळी कांचीकामकोटी पीठाचे जगद्रुरू शंकराचार्य विजयेंद्र सरस्वती स्वामी, आदित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर अभ्यंकर, अपर्णा अभ्यंकर उपस्थित होते. आपल्याच समाजाचे कार्य करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघात उपकाराची अथवा अहंकाराची भावना नाही, असे मत कृतज्ञता पुरस्कार स्वीकारताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, ‘‘संघाला संपूर्ण समाजाचे संघटन अभिप्रेत आहे. कारण समाज संघटित झाला तरच राष्ट्र वैभवसंपन्न होईल. राष्ट्र बलसंपन्न झाले तरच विश्वाला सुखशांती लाभेल. यातही देशाचे कल्याण संघच करेल, अशी आमची वल्गना नाही. तर समाज उभा राहिला तरच देश उभा राहील.‘‘ कठीण काळामध्ये समाजानेच संघाला साथ दिली, म्हणून संघ मोठा झाल्याचेही सरसंघचालक म्हणाले.

शंकर अभ्यंकर म्हणाले, ‘‘आक्रमणांमुळे जगातील अनेक संस्कृती नष्ट झाल्या. मात्र संपूर्ण वसुंधरेलाच कुटुंब मानणारी भारताची हिंदू संस्कृती आजही टिकून आहे. भौतिक आक्रमणांबरोबरच आंतरिक आक्रमणही भारतावर झाले. ब्रिटिशांनी भारताचा स्व मोडण्याचा प्रयत्न केला.‘‘ भारताची सनातन संस्कृती ही विश्वकल्याणासाठी मानवतेला मार्गदर्शक असून, हिंदू संस्कृतीच सर्वांचा स्वीकार करते, असे मत शंकराचार्यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, ‘‘अनेक भाषा, परंपरा, प्रांत असतानाही भारतात आधुनिक लोकशाही यशस्वी झाली आहे. कारण प्रजातंत्र हा सनातन धर्माचा भावच आहे. आज लोकशाहीला सामर्थ्यशाली करण्याची गरज असून, चांगल्या लोकांना बळ दिले पाहिजे.‘‘


### स्वयंसेवकांनी प्राण ओतून संघ उभा केला

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, रक्ताचे पाणी करत स्वतः बीज बनत, संपूर्ण आयुष्य मातीत मिसळून संघाचा वटवृक्ष उभे करणारे डॉ. हेडगेवार, राष्ट्रासाठी आपले जीवन ओवाळून टाकणारे प्रचारक, ग्रामीण व दुर्गम भागात जीव धोक्यात टाकून कार्य करणारे गृहस्थी कार्यकर्ते आणि अक्षरशः प्राण ओतून संघ उभा करणाऱ्या स्वयंसेवकांप्रती ही कृतज्ञता व्यक्त करायला हवी, असे मत सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले. पराकोटीचे हाल, उपेक्षा सोसूनही स्वयंसेवक हसतमुखाने कार्य करतो. विश्वकल्याणाची भावना असलेल्या या संघशक्तीतून समाजाला कधीही उपद्रव होणार नाही, असेही सरसंघचालक म्हणाले.

कार्यक्रमात वैश्विक संत भारती महाविष्णू मंदिराच्या कोनशिलेचे अनावरण, भारतीय उपासना या विश्वकोष खंडाच्या तिसऱ्या आवृत्तीचे आणि जितेंद्र अभ्यंकर कृत पंढरीश या ध्वनिफितीचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात रामायणावर आधारित निरंतर या संगीत नाटिकेने झाली. सूत्रसंचालन डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केले. जितेंद्र अभ्यंकर यांनी संपूर्ण वंदे मातरम सादर केले.

# ‘‘त्रिगुणात्मक त्रिमूर्ती-दत्त‘‘

**ज्योतिर्मय साहित्य**



येत्या दत्तजन्मोत्सवानिमित्त, आपण दत्ताच्या स्वरूपाची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करू. ‘‘त्रि‘‘ चे महत्व पाहू. दत्त हा शब्द संस्कृतमध्ये, दिलेला या अर्थाचा आहे. जसं की ‘‘निसर्गदत्त‘‘ म्हणजे निसर्गाने दिलेलं ! ब्रम्हा, विष्णू, महेश या त्रयींचं एकत्रित रूप म्हणजे त्रिमूर्ती दत्त ! उत्पत्ती, स्थिती आणि लय या तीन गोष्टींचा समावेश या तीन रुपात झाला आहे. उत्पत्ती म्हणजे निर्मिती सर्जनशीलता. स्थिती म्हणजे सांभाळणे आणि शेवटी लय म्हणजे विनाश. या तीन शक्तीनुसार, मनुष्याचे जीवन घडते. जन्म होतो आणि नाश होतो मधील काळात हसणं, रडणं, खेळणं, नाचणं, नवकर्म करणं या क्रिया घडतात. आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीने तीन शक्तींचा विचार एकत्रितपणे केला याचं खूप कौतुक वाटतं! यातील तीन या आकड्याला वैज्ञानिक दृष्टीने पाहिले तरी खूप महत्त्व आहे. पिंडी ते ब्रम्हांडी या उक्तीप्रमाणे, मूळ तत्व समजावून घेतले तरी, एक अणू सुद्धा, प्रोटॉन इलेक्ट्रॉन न्यूट्रॉन या तीन तत्वांनी बनला आहे. तीन गुणांनीच जीवाचे अस्तित्व व्यक्त होते. रज, तम आणि सत्व. याला, थोडसं त्रिकोण आकृतीच्या सहाय्याने समजावून घेऊ. त्रिकोणाच्या पायथ्याला डावीकडे रजोगुण, जो गती वाढवतो. उजवीकडे तमोगुण, जो अवरोधक शक्ती निर्माण करतो आणि त्रिकोणाच्या टोकाशी सत्वगुण आहे जो संतुलन साधतो. याप्रमाणे जीवनाचा संतुलित त्रिकोण दर्शवता येतो. याच तीन गुणांच्या आधारावर फलप्राप्तीची संकल्पनाही आपल्याकडे तीन रूपात दाखवली आहे स्वर्ग, नरक आणि मोक्ष!.



सौ.नीलिमा मकरंद बोकील, पुणे
मो. 94204 95478

विधायक कृतीने होणारी फलप्राप्ती ही स्वर्ग,विनाशक कृतीने होणारी फलप्राप्ती ही नरक आणि या दोन्हीला संतुलित करणाऱ्या शक्तीचा वापर मोक्षप्राप्ती करून देतो. वरकरणी पाहता जरी हे दत्ताचे स्वरूप आपल्याला कळले असे वाटले तरी, शक्तीचे हे एकत्रित रूप आकलन शक्तीच्या पलीकडील आहे. बाह्य आणि अंतरी सर्वत्र जो व्यापून आहे (सबाह्य अभ्यंतरी), त्याचे वर्णन शब्दातून करणे तर दूरच पण कल्पनातीत आहे. म्हणून तर दत्त महाराजांच्या आरती मध्ये एकनाथ महाराज ‘‘पराही परतली‘‘असे म्हणतात. (परा ही विचारांच्याही आधीची चेतन अवस्था आहे) दत्त रुपाचे आपले आकलन अपुरे पडते हे सांगताना, त्यांनी ‘‘नेति नेति शब्द न ये अनुमाना‘‘ असे म्हणले आहे. अर्थात, न इति, न इति - हे एवढेच पूर्ण नाही, इतकेच समजते आणि अंती अनुमानास पूर्ण रुप कळत नाही. एकनाथ महाराज म्हणतात..

‘‘दत्त दत्त ऐसे लागले ध्यान
हरपले मन झाले उन्मन
मी तू पणाची झाली बोळवण‘‘

आदि अंत जिथे एकरुप आहेत अशा दत्तांचे ध्यान करताना, पूज्यतेची भावना निर्माण होऊन सर्व अस्तित्वाप्रती समष्टीची भावना होते. मी,तू असा द्वैत भाव उरत नाही. मन उर्ध्वगामी विचार करते (उन्मन होते).

वाचक हो, या दत्तजन्मोत्सवानिमत्ताने, आपण या दत्तरुपाचे सतत ध्यान करु !

अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त!

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-१०६



आजच्या लघुलेखात आपण "जांभळा" या रंग प्रकाराबद्दल माहिती घेऊयात. माता सिद्धीदात्री यांचा प्रिय असा हा रंग आहे. उत्साह, वैभव, आध्यात्म आणि आरोग्य या विषयांमध्ये गती मिळण्यासा जांभळ्या रंगाचा अधिक उपयोग होतो. या रंगाला मनाची स्थिरता, भीतीवर मात करणे आणि ज्ञानाचे प्रतीक देखील मानले जाते. हा रंग सहस्राधार चक्राशी सोडलेला आहे. वैश्विक उर्जेशी संबंधित असा हा रंग आहे.

मनावर परिणाम करतांना संवेदनशीलता आणि कल्पनाशक्तीला चालना देतो. समृद्धी आणि प्रतिष्ठा; दक्षता आणि सुरक्षितता तसेच बुद्धीग्राहकता हे गुण, या रंगामुळे वृद्धींगत होतात. "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये आपण जांभळ्या रंगाचा आणि त्यांच्या विविध प्रकारच्या छटांचा उपयोग करतो.

लाल आणि निळ्या रंगाचे जे जे गुण आहेत ते सर्व "जांभळा" मध्ये अनुभवायला मिळतात. छाती दुखणे, सांधे दुखणे आणि ब्लॉकेज कमी-कमी होणे, या साठी घराच्या खोली ला "पर्पल" या "टींट" म्हणजे फिकट जांभळा रंग द्यायला हवा असे जाणकार सांगतात.

या रंगाचं आणखी एक महत्वाचं वैशिष्ठ्य म्हणजे, जांभळा रंग गेलेले पैसे परत मिळविण्यासाठी समोरच्या वर प्रभाव पाडतो. त्याचा पुनर्जन्माशी देखील संबंध आहे. जानकारांना म्हणजे ज्यांना असे वाटते की पैसे वाचवतांना त्यांचे नशीब सातत्याने त्यांना सुधारायचे आहे त्यांनी जांभळ्या रंगाचा प्रभाव असलेले सामान्य पेंटींग लावावे, जांभळ्या रंगांचे कपडे परिधान करतोय.

जांभळ्या रंगावर श्री कृष्ण आणि देवी महागौरी यांचा प्रभाव आहे. हिन्दू धर्मात, श्रीकृष्णाने जांभळ्या रंगाची वस्त्रे परिधान केलेली आहेत. जांभळ्या रंगावर गुरु आणि शनी या दोन्ही ग्रहांचा प्रभाव आहे. गुरु हा ज्ञानाचा आणि विस्ताराचा ग्रह म्हणून ओळखला जातो. वाढ, वृद्धी आणि समृद्धी दर्शवणारा हा ग्रह गती मिळण्याच्या गुणाला द्विगुणीत करतो. तर शनी महाराज,गूढता आणि स्थिरता दर्शवतात. त्यामुळे जांभळ्यालाही एक प्रकारची गूढता, स्थिरता प्राप्त होते.

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

पाहून लेकराला
माय मरून जगली
जीत्यापणी यातनांचा
मोठा पहाड चढली ||३७५||

माय उचलून घेते
लेकरू रडकं, शेंबड
घेते अलगद मुका
बोल बोलते बोबड ||३७६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## ट्युलिप्स आणि रानफुले- जीवनाची दोन प्रतीके




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

ट्युलिप्सच्या बागा म्हणजे आयुष्यातली 'स्थिरता' उत्तम नोकरी, सुंदर घर किंवा बंगला, नोकर चाकर, आलिशान गाडी, ऐश्वर्य, चैन आणि आराम आणि सहज उपलब्ध होणारं हक्काचं समाधान. ह्या बागा सुखद वाटतात, आकर्षक असतात. पण त्या इतक्या परिपूर्ण वाटतात की आपल्याला स्वतःला शोधण्याची गरजच वाटत नाही. आपण हरवून जातो त्यात. स्वतःला विसरून जातो.

आपल्याला वाटतं आपण सुखी आहोत बस, यापेक्षा स्वर्ग वेगळा तो काय असेल ? पण तो आनंद बाहेरून आलेला असतो. तो थोडा परकाच वाटतो.या बागांमध्ये फिरताना आपण जणू स्वप्नांच्या रंगांत न्हालेलो असतो. चारही बाजूंनी रंग सुगंध आणि समृद्धी !



इथं सगळं उठावदार आहे, पण आतलं काही तरी गहिरं हरवतंय.

हे जीवन सुंदर आहे, पण कधी कधी बेगडीही वाटतं.


कारण इथं फक्त पाहणं आहे जाणणं नाही.

मला मात्र रानफुलं प्रतीक वाटतात साधेपणा, संघर्ष, आणि आत्मसुख यांची.

रानफुलांना गंध नसतो. त्यांचं रंगसंगतीही ट्युलिप्सइतकी उठावदार नसते. पण रानफुलं जेव्हा एखाद्या दगडावर, किंवा वाऱ्याच्या जोरावर उभी राहतात तेव्हा त्यांचं अस्तित्वच प्रेरणा ठरतं. विपरीत परिस्थितीलाही टक्कर देण्याची क्षमता ते राखून असतात. कारण विपरीत परिस्थितीतच ती फुललेली असतात. कोणी त्यांना पाणी घालत नाही. त्यांना खत देत नाही, त्यांची देखभाल करत नाही. मला इथे आठवते ती मंगेश पाडगावकर यांची एक सुंदर कविता. मी फुल तृणातील इवले...

पाडगावकर खरोखरच एक सिद्धहस्त कवी. जीवनावर प्रेम करायला शिकवणारे, निसर्गावर प्रेम करायला शिकवणारे. त्यांच्या विविध कविता आपलं जीवन अन भावविश्व समृद्ध करतात. एक नवीन दृष्टिकोन देतात. थोड्याशा संकटांनी खचून जाणाऱ्या, निराश होणाऱ्यांना या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे म्हणत जगण्याचा अर्थ अन महत्व ते समजावून सांगतात. तर श्रावणात घननीळा बरसला सारख्या कवितेतून निसर्गाकडे पाहण्याचा, त्याचं सौंदर्य टिपण्याचा एक सुंदर दृष्टिकोन बहाल करतात. मी फुल तृणातील इवले ही कविता तर कसं जगावं हे समजावून सांगते असं मला वाटतं. जे काही आपल्याजवळ आहे, त्याचा अभिमान बाळगावा, स्वत्व, स्वाभिमान कधीही विकू नये. समोरची व्यक्ती, शक्ती कितीही बलाढ्य असली तरीही !

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सगुणभजन


ज्योतिर्मय साहित्य

आपण जन्माला आल्यापासून पाणी प्यायला लागते,जेवायला लागते,घरदार लागते भावंडे लागतात संसार लागतो हे सर्व लागते तर हे जसे काही चुकत नाही. आपल्या लोकांचे भले व्हावे ही जशी आपली संस्कृती आहे तशी सगुणोपासना न करता जीवन जगणे भजनपूजन न करता जीवनातील बाकीचे कर्म करत रहाणे याला ज्ञान म्हणत नाही. आपण जीवन जगत असताना हरेक कर्म करतो. पण,देवधर्म करायचा म्हणले की नाके मुरडतो हे तर अज्ञान आहे

२१ व्या ओवीत समर्थ म्हणतात की मी ज्या कुळात जन्माला आलो त्या कुळाचा कुलस्वामी श्रीराम आहे. तो माझं भरणपोषण करतो. ''आम्ही काय कुणाचे खातो आमचा राम आम्हाला देतो.''या ओळीवरून समर्थांच्या रामभक्तिची कल्पना येते. ''मी फक्त शहाणा ''अशा देहबुध्दीच्या माणसाचा विकास कधीच होत नाही.आपण तर परमार्थ साधत जीवन जगणारी माणसं आहोत.परमार्थ हा अतींद्रिय अनुभवाचा प्रांत आहे. आपल्याला परमार्थ समजत नाही तर आपण तो ज्ञानी पुरूषा कडून समजून घेतला पाहिजे. ज्ञानी लोक जे सांगतील त्या वर विश्वास ठेवला पाहिजे. त्यांना विनाकारण दोष लावून नाना विकल्प मनात आणून आपली श्रध्दा भंग होउ देऊ नये. ''मला सर्व समजते'' ही भावना परमारर्थात अती घातक ठरते. अशा बुद्धीहीन माणसाचे होते काय तर धड ज्ञान नाही धड भक्ति नाही आहे तो केवळ असार होय.थोर पुरूषाच्या ज्ञानी पुरूषशाच्या मनातून उतरणे हीअगदीच दुर्दैवी घटना आहे. राजपदाचा हक्क असणारा एखादाच राजपुत्र आपल्या दुराचाराने तो हक्क गमावून बसतो आणि दुर्दैवी बनतो. मी मोठा आहे मी आत्मज्ञानी असल्याची खुण सतत मिरवत रहाणे हे आत्मज्ञान .नसून देहाभिज्ञान आहे. देहाभिज्ञानाची सुप्त कल्पना त्याच्या अतर्यामी सतत वास करत असते।

(क्रमशः)

## जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संतांचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।




## ''नो मोबाईल फोन फोबिया''

ज्योतिर्मय साहित्य

स्मार्टफोनच्या वापराचा संबंध मुलांमध्ये उदासीनता आणि चिंता यासारख्या विध्वंसक भावनिक समस्यांशी जोडला गेला आहे. कोणत्याही निर्बंधाशिवाय सेल येत असल्याची प्रकरणे वाढत आहेत. मोबाइल फोनच्या वापरामुळे तरुणांना अटॅक उपकरणांच्या विचलनामुळे उत्पादकता कमी होऊ शकते आणि कार्यांवर लक्ष केंद्रित करण्यात अडचण येऊ शकते, ज्यामुळे शैक्षणिक आणि वैयक्तिक कामगिरीवर नकारात्मक परिणाम सोशल मीडिया आणि ऑनलाइन परस्परसंवादामुळे चिंता, नैराश्य आणि सामाजिक अलगावची भावना निर्माण होऊ शकते.

पण मग याला पर्याय काय ?

आपल्याला एव्हाना कळून चुकलं आहे की, या पिढीपासून तंत्रज्ञान आपण दूर करू शकत नाही. त्यांच्या हातातून काढून घेऊ शकत नाही. कारण त्यांच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानवापर आवव्यक आहे. म्हणजे मग आपण मुलांना फक्त योग्य पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर करायला शिकवू शकतो. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आपल्याला देखील या सर्व तंत्रज्ञानासंदर्भात अपडेटेड राहावं लागेल. मुलांशी त्यांच्या भाषेत बोलण्याकरिता ते वापरत असलेले पॉप्युलर ॲप्स आपल्याला माहिती हवेत. आपणच, मोबाईल आणि टीव्ही यांचा वापर, गरजेपुरता केला पाहिजे. लहान मुले, मोठ्यांचेच अनुकरण करत असतात. जे नियम लहानांनी पाळले पाहिजेत असे वाटत असेल तर, त्याची सुरुवात, प्रथम स्वतः पासून केली पाहिजे. त्यात मोबाईल ही आला. आपणच गरजेपुरता मोबाईल, टीव्ही यांचा वापर केला पाहिजे. तरच आपल्याला, लहान मुलांना, मोबाईल वापरू नका असे सांगण्याचा अधिकार प्राप्त होतो. बोर्ड गेम खेळणे किंवा तुमच्या मुलाला साफसफाई, स्वयंपाक किंवा बागकाम यासारख्या क्रियाकलापांमध्ये गुंतवून ठेवणे तिला स्मार्टफोन पासून दूर ठेवेल. तुमच्या मुलाला संगीत ऐकणे, एखादे वाद्य वाजवणे, वाचन किंवा चित्रकला यासारखे छंद जोपासण्यासाठी प्रोत्साहित करा. तुमच्या मुलांना त्यांचा मोबाईल रात्री ठराविक वेळेपेक्षा जास्त वापरू देऊ नका. मुलाला निसर्गाकडे आकर्षित करा आणि मैदानी खेळांसाठी देखील प्रोत्साहित करू शकता.

पाळीव प्राणी - मुलाला मोबाईल ऐवजी पाळीव प्राणी द्या, जेणेकरून मुले संवाद साधण्यास आणि भावना व्यक्त करण्यास शिकतील.

फोनमध्ये ठेवा लॉक- आजकाल प्रत्येक फोनमध्ये वेगवेगळ्या प्रकारची काही खास फंक्शन्स असतात, जी त्यांना लॉक करता येतात. लहान मुलांना पालकांच्या देखरेखीखाली स्क्रीनचा वापर करायला लावावा त्यांना वयानुरूप अटी घातल्या गेल्या पाहिजेत. सलग तासभर मोबाइल पाहण्यापेक्षा दिवसातून तीन वेळा वीस - वीस मिनि पाहायला देणं, जास्त चांगल.

प्रेम आणि काळजी - मुलांना त्यांच्या पालकांच्या प्रेमाची आणि काळजीची सर्वात जास्त गरज असते. अशा परिस्थितीत तुम्ही मुलासोबत जास्तीत जास्त वेळ घालवणे गरजेचे आहे, यामुळे तुमचे मूल हळूहळू मोबाईल वापरणे बंद करेल. जर तुम्ही स्वतः मोबाईलच्या व्यसनाचा सामना करू शकत नसाल आणि तुमचे प्रियजन तुम्हाला जास्त मदत करू शकतील असे वाटत नसेल तर ची मदत घेण्याची वेळ आली आहे. असे थेरपिस्ट आहेत जे मोबाइल व्यसन थेरपीमध्ये विशेषज्ञ आहेत. ***



## ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

आपल्या घरात । रहावे सुखात ।
आपले बोलणे । ऐकतसे वास्तू ।
बोलावे हसत । सदोदित ।।१।।
म्हणते तथास्तु । कधी कधी ।।२।।
अशुभ बोलता । जर म्हणे वास्तू ।
हळूच तथास्तु । पंचाईत ।।३।।
माधव हा म्हणे । बोला सदा शुभ ।
नाकारा अशुभ । विचारांना ।।४।।




## महिनाभर भात सोडल्याने खरंच वजन कमी होते का?

ज्योतिर्मय साहित्य

अनेकांना पोळी-भाजीसोबत भात देखील रोज हवाच असतो. भाताशिवाय त्यांचे जेवणच पूर्ण होऊ शकत नाही. साधे घरगुती जेवण असो किंवा भव्य मेजवानी असो, भात जवळजवळ प्रत्येक जेवणात एक महत्त्वाचा घटक असतो. काही लोक भाताशिवाय जेवणाची कल्पनाही करू शकत नाहीत. भाताचे तसे अनेक प्रकार आहेत जसं की डाळ-भात, कधी खिचडी, कधी पुलाव लोकांना खायला आवडतो. तर अनेकजण डाएट म्हणून भात खाणे टाळतात. पण जर विचार केला अन् खरंच एक महिना भात खाणे सोडून दिले तर शरीरात काय बदल होऊ शकतात? चला जाणून घेऊयात.

सुरुवातीचे काही दिवस थोडे कठीण असू शकतात.

जर तुम्हाला रोज भात खाण्याची सवय असेल आणि तुम्ही अचानक भात खाणे बंद करता तेव्हा तुमच्या शरीराला त्याच्याशी जुळवून घेण्यास थोडा वेळ लागतो. सुरुवातीचे काही दिवस तुम्हाला जास्त भूक, अशक्तपणा किंवा थोडीशी चिडचिड वाटू शकते. कारण भात तात्काळ ऊर्जा प्रदान करतो आणि जेव्हा ती कमी होते तेव्हा तुमचे शरीर थोडे सुस्त होते. परंतु जसे तुम्ही तुमच्या आहारात इतर धान्ये, जसे की बाजरी, बार्ली, क्विनोआ, गोड बटाटे किंवा मसूर यांचा समावेश करता, तसे तुमचे शरीर हळूहळू जुळवून घेते.

महिनाभर भात सोडल्याने वजन कमी होते का?

भातामध्ये कार्बोहायड्रेट्स भरपूर असतात आणि ते सहज पचतात. जेव्हा तुम्ही भात खाणे टाळता तेव्हा तुमचे शरीर कमी कॅलरीज वापरते, ज्यामुळे वजन कमी होऊ शकते. वजन कमी करू इच्छिणारे

बरेच लोक भाताचे सेवन कमी करतात किंवा आठवड्यातून एकदा किंवा दोनदाच खातात. त्याऐवजी दलिया, ओट्स किंवा बाजरीसारखे पदार्थ खाल्ल्याने तुम्हाला जास्त वेळ पोट भरल्यासारखे राहण्यास आणि भूक कमी होण्यास मदत होते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

रक्तातील साखरेवर काय परिणाम होईल?

पांढरा तांदूळ सहज पचतो आणि त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण जलद वाढते. महिनाभर भात टाळल्याने तुमच्या रक्तातील साखरेची पातळी अधिक स्थिर राहण्यास मदत होऊ शकते. मधुमेह किंवा रक्तातील साखरेची समस्या असलेल्यांसाठी हे विशेषतः फायदेशीर आहे. भात टाळल्याने गोड पदार्थांची इच्छा थोडी कमी होऊ शकते.


पांढऱ्या भाताला ब्राऊन राईस हा पर्याय

काहींना रोजच भात खाण्याची इच्छा होत असेल आणि ती रोखणे शक्य नसेल तर तुम्ही पर्यायी ब्राऊन राईस खाऊ शकता. त्यामुळे तुमची शुगर कंट्रोमध्ये राहू शकते तसेच त्यामुळे वजनही कमी होऊ शकते.

पचनक्रियेत थोडे बदल जाणवू शकतात

काहीजणांना भात खाल्ल्याने पोटाला आराम मिळतो तर काहींसाठी ते गॅस किंवा बद्धकोष्ठतेचे कारण बनू शकते. जेव्हा तुम्ही भात खाणे सोडून देता तेव्हा सुरुवातीला तुम्हाला पोटदुखी किंवा बद्धकोष्ठतेचा अनुभव येऊ शकतो. तथापि, जर तुम्ही भाज्या, फळे आणि संपूर्ण धान्यांचे सेवन वाढवले तर तुमचे पचन लवकर सुधारेल.

(क्रमशः)



## लघु बोधकथा

### कसाई

श्रद्धा बकरीला आपल्या बाळाची चिंता होती. बाळ मोठं झाल्यावर त्याला कापायला नेतील. ती काय करावे याचा विचार करीतच होती. अशातच कसाई आला. त्यानं तिच्या बाळाला पाहिलं. तिला राग आला. काय करावे सुचेनासं झालं. अशातच तिला आठवलं. आपल्याला शिंगे आहेत. शिंगाचा योग्य वापर करायला हवा. तिचा तो विचार. ती विचारच करीत होती. एवढ्यात श्रद्धानं आपली अगाढ ताकद लावून त्याच्या पोटात आपली शिंग खुपसली. तसा कसाई खाली पडला. रक्त वाहू लागलं व तो क्षणातच गतप्राण झाला.

बोध- मुक्या प्राण्यांना त्रास देवू नये.

# ज्ञानेश्वरांची गुरुभक्ती

**ज्योतिर्मय साहित्य**

**सिद्धहस्त लेखिका, कवयित्री, शासकीय महाविद्यालयातून प्राचार्य म्हणून सेवा दिलेल्या, अध्यात्माचा व्यासंग असलेल्या, डॉ. शारदा शेवतेकर (बडवे), यांच्या लेखणीतून उतरलेला ज्ञानेश्वरांची गुरुभक्ती या विषयावरचा हा लेख.**

अध्यात्मात गुरुला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अध्यात्मिक प्रगतीसाठी गुरु असणे आवश्यक मानले आहे. गुरुशिवाय अध्यात्मात प्रगती होणे शक्य नाही असे हिंदू धर्मातील धार्मिक ग्रंथातून सांगितले आहे. सद्गुरु श्रीगुरु हे ब्रह्मानंद स्वरूप परमसुख देणारे, ज्ञानमूर्ती असलेले द्वंद्वाच्या पलिकडे पोहचलेले, आकाशा एवढे व्यापक, शुद्ध तत्वस्वरूप, नित्य, निर्मल अचल, निरंतर, साक्षीभूत, संसारापासून अलिप्त, त्रिगुणरहित, परम सूक्ष्म अशा या परमात्म गुरु तत्वाला वंदन! साष्टांग प्रणिपात.

ज्ञानेश्वरांचे सद्गुरु श्री निवृत्तीनाथ यांचे वर्णन ज्ञानदेव महाराज निर्गुण शिवतत्त्व - परब्रम्ह श्री गुरु असे करतात. श्री निवृत्तीनाथ हे परब्रम्ह स्वरूप असल्याने परमात्म्याला, परब्रह्माला लागू पडणारी सर्व विशेषणे त्यांनाही श्री गुरु म्हणून लागू पडतात. श्रीगुरु ही व्यक्ती नसून परमगुरुतत्त्व आहे. अशा श्रीगुरुचा आश्रय श्री ज्ञानदेव माऊलींनी ज्ञानलक्षणात्मक भक्तीवृत्तीने घेतला होता.

ज्ञानदेवांची गुरुभक्ती अपूर्व आहे. आपले गुरु निवृत्तीनाथ यांच्या विषयी त्यांनी व्यक्त केलेला प्रेमादर हणजे ज्ञानेश्वरीतील प्रेमरस आहे. ज्ञानेश्वरीच्या प्रत्येक अध्यायात आपल्या गुरु बद्दलची श्रद्धा विश्वास प्रेम सतत व्यक्त झाले आहे. १३ व्या अध्यायातील आचार्यो ''पासनम् या एका पदावर ते शेसव्वाशे ओव्यांचे रसाळ प्रवचन करतात. हेही त्यांच्या गुरुभक्तीचे गमक आहे. श्रीनिवृतीनाथांच्या समोर, त्यांच्या कृपादृष्टीखाली रचिलेल्या गीता टिकेतील ओवी ओवीतून ज्ञानदेवाचा गुरुगौरव व्यक्त व्हावा यात काहीच नवल नाही.

निरनिराळ्या अध्यायाच्या प्रास्ताविक व समारोपात्मक ओव्या पैकी एकुण अडीचशे ओव्या त्यांनी गुरुस्तुती पायी वेचल्या आहेत.

ग्रंथारंभीच्या मंगलचरणात आपले हृदयस्थ सद्गुरु श्रीनिवृत्तीनाथ यांना पुढत पुढती अभिवंदन करून त्यांची कृपा अवर्णनीय असल्याने ज्ञानदेवांनी आपला माथा त्यांचे चरणी निवांतपणे ठेविला आहे. श्रीगुरु चरणाच्या नुसत्या आठवाने शब्दसृष्टी आत्मसात होऊन अवघे सारस्वत जिव्हेशी येईल व गोडपणात अमृतालाही लाजवेल असे वक्तृत्व लाभेल हे जाणून आपल्या ग्रंथोद्यमी वेव्हारा म्हणजे सावकार होण्या विषयी त्यांनी गुरुस विनंती केली आहे.



एका गुरुकृपेच्या बळावर आपला वाग्यज्ञ शेवटास जाईल असा भरवसा ज्ञानदेवास वाटलो. गुरुकृपा लाभल्यास आपली वाचा ही प्रत्यक्ष सुधासिंधू होऊन अंगच्या वक्तृत्वाने ती श्रोत्यांना ज्ञानाची दिवाळी करीन व एकदा ही वाचावल्ली फोफावली की श्रवण सुखाच्या मांडवात विश्व आनंदाचा सण भोगील, असे ते म्हणतात. ज्यावरून पूर्ण चंद्राची कुरखंडी करावी, ज्यापुढे प्रत्यक्ष नादब्रह्म खुजे ठरून, कैवल्याचीही शोभा लोपते, व जेथे सकलार्थ मेळावा आहे अशात अपूर्व वक्तृत्वाचे सौभाग्य श्रीगुरुपादपद्म परागाची जोड होईल तरच लाभणार. ज्ञानदेव म्हणतात की ही गुरुकृपा माझ्यावाचून अन्यत्र कोठेही नाही. मी माझ्या गुरुचे एकुलते एक अपत्य असल्याने त्यांची कृपा माझ्या वाट्यास एकहाती आली आहे. द्वादश अध्यायाच्या प्रारंभी एकाअध्यामिक रुपकाचा आश्रय घेवून गुरुकृपेचे आवाहन करतोना ज्ञानदेव म्हणतात, वो शुद्धे अक्षर प्रसिद्धे गुरु कृपे, आनंदाचा अनवरत्व वर्षाव करणाऱ्या, तुझा जयजयकार असो ! तू आधार शक्तीच्या अंगावर साधरूपी बालकास मोठ्या कौतुकाने वाढवितोस, हृदयांभाश मंचकावर त्याला परिये म्हणजे झोके देतेस, प्रत्येक ज्योतीची ओवाळणी करून आत्मसुखाची बाळलेणी तू त्याच्या अंगावर घालतेस. अमृतकलेचे स्वन्यदेवून, अनाहताचा हल्लर गाऊन त्याग समाधिबोधामध्ये निजवतेस तेंव्हा योग सुखाचे सोहळे पुरविणारी अशी तू साधकाची माऊली होतेस. तुझ्या पावली सारस्वत पिकत असल्याने तुझी सावली मी कदापि सोडणार नाही. हे श्रीमंत गुरुकृपे तू मला ग्रंथ निरूपणाची आज्ञा केलीस तर नवरसांनी सागर भरतील, भावार्थाचे गिरविट निपजतील या देशी भाषेच्या क्षेत्री साहित्य सोनियाच्या खाणी उघडतील आणि सर्वत्र विवेक वल्लीची लावणी होऊन प्रमेयांची उद्याने संवादफळांनी बहरून जातील, गुरुमाऊली तू मला आपल्या प्रेम पदराआड मला घेशील तर ही अपूर्ण वाकसृष्टी मी तात्काळ निर्माण करीन.

अशाच एका गोड रुपकाने १५व्या अध्यायाच्या प्रारंभी गुरुचरणपूजा केली असून रस व अलंकार ही काव्यांगे तेथे एकरूप झाली आहेत. ज्ञानदेव म्हणतात आपले हृदय चौफाळून, त्याचा चौरंग भरून त्यावर गुरुचरणांची स्थापना करु व ऐक्यभावाच्या ओंजळीतून सर्वद्रियांची पुष्पांजळी त्यावर वाहु, अनन्योद्भावे धुतलेल्या एकनिष्ट वासनेच्या चंदनाची उटी लावून विशुद्ध प्रेमसुवर्णाची नुपूरे गुरुचरणी घालू, आनंदाने मुसमुसलेले व अष्टसात्विक भावांनी फुललेले कमळ त्यावर वाहू, तेथे अहंकाराचा धूप जाळून जाळून स्नेह तेजाने ओवाळू व सामरस्याचे निरंतर क्षेमालिंगन त्यास देऊ, आपला देह आणि प्राण या दोन पादूका श्री चरणी घालून, भोग मोक्षाचे निंबलोण त्याचरणावरून ओवाळून टाकू. (अ.१५-१-८) ही गुरुचरणसेवा निवृत्तीनाथांना मान्य झाली आणि त्यांच्या कृपेने ज्ञानदेवाचे दैव उजळले.



डॉ शारदा शेवतेकर

१६व्या अध्यायाच्या आरंभी सद्गुरुवर चितसूर्याचे अपूर्व रूपक रचून झानदेवे म्हणतात की, ज्यास नेणिवेनेच जाणावे व मौनानेच वर्णावे अशा गुरुदेवाची यथार्थ स्तुती मी कशी भरणार? त्या अद्वयानंदास मौन द्वैत बुद्धीने स्तवणे म्हणजे अमृताच्या सागरास पाहुणेर करण्यासारखे आहे, हे खरे, पण। गुरुदेवा, माझा भक्तिभाव ध्यानात घेऊन, आपण ही धिटाई सहन करा. आपल्या गुणसेवेनी मी लाचावलो असल्याने

या स्तुतीपात्रावरून अर्धपोटी कदापि उठणार नाही. आपले गीतारूपी प्रसादामृत मला लाभले हे मी केलेल्या सत्यवादी तपाचे व पोसलेल्या पुण्यांचे फळ आहे यात संशय नाही.

अठराव्या अध्यायात ज्ञानदेव आपल्या गुरूंचा जयजयकार करतांना म्हणतात की, तुमचे वर्णन करण्यासाठी लागणारे शब्द माझ्याजवळ नाहीत, माझ्या मौन राहण्याचे लेणे मी तुमच्या अंगावर चढवितो, अबोल राहणे हीच तुमची स्तुती व काहीच न करणे ही तुमची पूजा होय. गुरुविषयी बोलतांना ज्ञानदेव म्हणतात, गुरुदेवा तुम्ही सर्वांचे मंगल करणारे आहात, तुम्ही सर्वात बलवान आहात, सर्व दुःखाचा नाश करणारे आहात, तुम्ही स्वयंप्रकाशी, आनंदाला स्फूर्तीदेणार, पापाचे निरसन करणारे आहात, तुम्ही आकाश आहात, दयेचे समुद्र आहात, भक्ताच्या चित्तातील दीप आहात, तुमचे रूप अद्वितीय आहे. तुम्ही कल्पवृक्ष आहात, ज्ञानवृक्षाच्या बीजाचे उत्पत्तीस्थान आहात. माय-बाप आहात'' ज्ञानेश्वरीचा समारोप करताना ज्ञानदेव म्हणतात, की श्रीव्यासांची वाणी मी मराठीच्या श्रवणीपयास आणली खरी, पण ही माझी केवळ वाचाळी आहे. इतकेच की, सर्वोपकारी समर्थ सदुरु श्रीनिवृत्तीनाथ माझ्या अंतरी आहेत, म्हणून मीही गीताटीका रचण्यास धजलो. चंदनाने वेधलेली सामान्य झाडेही जेथे चंदनाच्या पाडास येतात, तेथे माझ्यासारखा एकचित्त भक्त आणि श्रीगुरु ऐसा दादूला, असा योग जमल्यावर केवळ दृष्टीपातानेही ते महा स्वपदी का बसविणार नाही? देखणी दिठी आणि सूर्य पाठी असे असल्यावर दिसणार नाही अशी एक तरी गोष्ट आहे काय? तेव्हा श्रीगुरु कृपेने माझे नित्यनवे श्वासोश्वासही प्रबंधरूप व्हावे यात अशक्य असे काहीच नाही. ज्ञानदेवांच्या गुरुभक्तीची इथे परिसीमा झाली असून ती पाहून भक्ती हा स्वतंत्र रस मानावा असे वाटते. ज्ञानदेव महाराज म्हणतात, श्रीगुरुची कृपा झाली तरच स्वानुभावाचे, आत्मज्ञानाचे भाग्य लाभेल. परब्रम्ह ज्ञान लाभेल. ज्ञानदेव म्हणे गुरुकृपा सांग ।

तरचि हे भाग्य येईल हाता।।





# श्री पद्मनाभ स्वामी मंदिर तिरुव अनंत पुरम

**ज्योतिर्मय साहित्य**

केरळ राज्याची राजधानी असलेल्या त्रिवेंद्रम अर्थात तिरूव अनंतपुरम या पावन नगरीत असलेल्या पद्मनाभ स्वामी मंदिरास आज आपण भेट देणार आहोत.

तिरुव अनंतपुरम या शब्दाचा अर्थ अनंत (शेष)नागाची पवित्र नगरी असा होतो.



पद्मनाभाचे हे मंदिर किमान १२०० वर्षे जुने आहे. नवव्या व दहाव्या शतकात चेरा व चोल राजांनी याची दुरुस्ती केली. मंदिराची आज दिसणारी रचना सोळाव्या ते सतराव्या शतकात पूर्ण झाली. या मंदिराला एक उंच सात मजली गोपूर आहे. सुबक पाषाण, कोरीव काम आणि प्रतिमा दालन यांनी मंदिर सजलेले आहे. इथे सोन्याने मढवलेला ध्वज स्तंभ आहे. आणि मंदिरात संध्याकाळी दीप मालिका लावल्या जातात. दक्षिण भारतातील सर्व मंदिरात गर्भगृहात केव्हाही विजेचा वापर केल्या जात नाही तर पणत्यांची आरासच गाभारा उजळविते.

शेषनागावर विश्राम घेत असलेली भगवान अशी भव्य अठरा फूट लांबीची आणि १०८ शाळीग्रामा पासून बनविली आहे. या शिवाय ती कडू शर्करा योगम नावाच्या विशेष मिश्रित औषधी गुह्यम पदार्थापासून बनविली असल्याचेही म्हटले जाते. मुख्य मूर्तीचे दर्शन तीन दरवाजातून घेता येते पहिला शीर्ष मुख भाग दुसरा नाभी भाग नाभीतून कमळावर ब्रह्मदेव विराजमान आहेत, आणि तिसरा भाग पाय. भगवंताच्या पायाजवळ भूदेवी व श्रीदेवी विराजमान आहेत. भगवंताच्या डाव्या हातात शंख उजव्या हातात कमळ व दुसऱ्या दोन हातात गदा व चक्र आहे. तसे छातीवर लक्ष्मी निवास करते.

*पौराणिक कथा*

पुराण काळी तिरुवनंतपुरम च्या पूर्वेस कांचीपुरम येथे एक महान विष्णूभक्त होऊन गेले. त्यांचे नाव दिवाकर मुनी असे होते. ते प्रभुचे नीस्सीम भक्त होते. सतत प्रभू चे नामस्मरण,ध्यान यात ते लीन राहत असत. अहोरात्र त्यांचे नामस्मरण चालत असे. कित्येक वर्षाच्या त्यांच्या तपश्चर्ये नंतर त्यांना आता प्रभू दर्शनाची आस लागली. म्हणून ते भगवंताला, दर्शन दे, दर्शन दे असे म्हणून विनवू लागले.

त्यांच्या विनंतीला मान देऊन भगवंत एकदा त्यांच्यासमोर बालक रुपात प्रगट झाले. एक सुंदर कृष्ण वर्ण बालक त्यांच्या आश्रमा जवळ आला. त्याच्या डोळ्यात तेज होते, त्याचे हास्य मोहक होते.तो हातात कमंडलू घेतलेला होता. **(क्रमशः)**

# सासवडच्या खेळाडूंची सुवर्णपदकांची लयलूट, वाघिरे महाविद्यालयाची पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत घौडदौड

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीद्वारे, डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, पिंपरी येथे, संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयीन पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत मुलांच्या गटात, ३ सुवर्ण व मुलींच्या गटात २ सुवर्ण पदके अशी एकूण ५ सुवर्ण पदके जिंकून वाघिरे महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. गणेश तोटे, रितेश चव्हाण, पृथ्वीराज शिंदे, प्रतिभा लोणे व सिद्धी काळाने ह्या पाचही खेळाडूंनी आपापल्या गटात प्रथम क्रमांक मिळवून दबदबा कायम ठेवला.



९३ किलो वजन गट - रितेश चव्हाण: स्कॉट: १५० किलो, बेंचप्रेस: ११० किलो, डेडलिफ्ट: २३० किलो, एकूण: ४९० किलो,

१०५ किलो वजन गट - गणेश तोटे: स्कॉट: २५० किलो, बेंचप्रेस १२० किलो, डेडलिफ्ट: २६७.५ किलो, एकूण: ६३७.५ किलो,

१२० किलो वजन गट - पृथ्वीराज शिंदे: स्कॉट: १९० किलो, बेंचप्रेस: १२० किलो, डेडलिफ्ट: १५० किलो, एकूण: ४६० किलो,

वजन गट ५२ किलो - सिद्धी काळाने: स्कॉट: १२५ किलो, बेंचप्रेस: ७० किलो, डेडलिफ्ट: १४० किलो, एकूण: ३३५,

वजन गट ८४ किलो - प्रतिभा लोणे: स्कॉट: १४० किलो, बेंचप्रेस: ६० किलो, डेडलिफ्ट: ७० किलो, एकूण: २७० किलो.

सुवर्णपदक प्राप्त पाचही खेळाडूंची निवड ९ डिसेंबर रोजी सीडी जैन महाविद्यालय, श्रीरामपूर येथे संपन्न होणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आंतर विभागीय स्पर्धेसाठी पुणे जिल्हा आंतर विभागीय क्रीडा समिती संघात झाली आहे.

सदर यशाबद्दल सर्व खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित शेळके, उपप्राचार्य डॉ.बी.यू.माने, डॉ.संजय झगडे, रवि जाधव यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या. संघास शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. प्रितम ओव्हाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

# शिवम वडार पुणे जिल्हा श्री २०२५ किताबाचा मानकरी

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीद्वारा आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन शरीरसौष्ठव स्पर्धेचे सांघिक विजेतेपद ३ सुवर्ण १ रौप्य व १ कांस्य पदक जिंकून सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाने पटकाविले. तसेच वाघिरे महाविद्यालयाच्याच शिवम वडार याने ''आंतर महाविद्यालयीन पुणे जिल्हा श्री २०२५'' चा किताब पटकाविला. चषक व आंतर महाविद्यालयीन पुणे जिल्हा श्री किताब देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.

स्पर्धेचे आयोजन वाघिरे महाविद्यालय, सासवड येथे प्राचार्य डॉ.पंडित शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली व शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा.प्रितम ओव्हाळ यांच्या संकल्पनेतून करण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते महादेव सपकाळ यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.संजीव पवार, डॉ.अमेय काळे उपस्थित होते. या स्पर्धेसाठी महादेव सपकाळ, प्रा.अनिल मरे, धनंजय बागडे यांनी पंच म्हणून काम पाहीले.

सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक व आंतर महाविद्यालयीन पुणे जिल्हा श्री किताबाचा चषक रमेश ओव्हाळ यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबातील सदस्य अर्चना जगताप व प्रितेश ओव्हाळ यांच्या हस्ते पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीस स्पर्धेपूर्वी सुपूर्त करण्यात आला. तसेच आंतर महाविद्यालयीन पुणे जिल्हा श्री २०२५ किताबाच्या मानकऱ्यास प्रा.संजीव पवार यांच्या तर्फे ३,३३३ रुपये रोख रक्कम देण्यात आली.




या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.बी.यू.माने, डॉ. संजय झगडे, लेफ्टनंट गजेंद्र अहिवळे, रवी जाधव, डॉ.बाळासाहेब मरगजे, डॉ.सविता फलके, प्रा.श्रीकृष्ण थेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.प्रितम ओव्हाळ यांनी केले.

स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढील प्रमाणे, आंतर महाविद्यालयीन पुणे जिल्हा श्री: शिवम वडार(वाघिरे महाविद्यालय, सासवड),

६० किलो वजन गट - प्रथम क्रमांक: विनीत नेमाडे(एमआयटी, एसीएस, आळंदी), द्वितीय क्रमांक: सरोज सूरज(एसएम जोशी महाविद्यालय, हडपसर), तृतीय क्रमांक: कृष्णा फडतरे(अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर),

६५ किलो वजन गट - प्रथम क्रमांक: पांडुरंग भोसले(वाघिरे महाविद्यालय, सासवड), द्वितीय क्रमांक: स्वप्नील साकुंडे(एबी तेलंग महाविद्यालय, निगडी), तृतीय क्रमांक: साहिल शेख(बीआर घोलप महाविद्यालय, सांगवी),

७० किलो वजन गट - प्रथम क्रमांक: भूषण फलके(डीवायपीएसीएस, पिंपरी), द्वितीय क्रमांक: अवधूत गुरव(वाघिरे महाविद्यालय, सासवड), तृतीय क्रमांक: प्रवीण खराडे(व्हिपी महाविद्यालय, बारामती),


७५ किलो वजन गट - प्रथम क्रमांक: शिवम वडार(वाघिरे महाविद्यालय, सासवड), द्वितीय क्रमांक: राहुल शेटे(सीओपी महाविद्यालय, मालेगाव), तृतीय क्रमांक(एमएस काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर),


८५ किलो वजन गट - प्रथम क्रमांक: ओम शिंदे (टीसी महाविद्यालय, बारामती), द्वितीय क्रमांक: अनिकेत भारती(जीएसएमसीओई, बालेवाडी), तृतीय क्रमांक: रंजन धुमाळ(वाघिरे महाविद्यालय, सासवड),

९० किलो वजन गट - प्रथम क्रमांक: ओम जाधव(एटीएसएस, चिंचवड),

९० किलो वरील खुला गट - प्रथम क्रमांक: संकेत काळे(वाघिरे महाविद्यालय, सासवड), प्रेम ओव्हाळ(पीसीसीओईआर, रावेत).






# एक चैतन्य सूर्याचा अस्त जाहला

**ज्योतिर्मय साहित्य**

''म्हणती गुरू त्याला । चालवी सांप्रदाय आपुला''

श्री गुरूमहाराज दत्त अवधुत पंथाचे एकनिष्ठ भक्त ते ह्या भक्ती पासुन कधी ही ढळले नाहीत, घरातच दत्त म्हटल्यावर तो प्रश्न उद्धवत नाही. दत्त अवधुत पंथा मध्ये त्यागी ध्रुवा सारखे रुपात पाहतो तसे श्री दत्ताबुवा महाराजांना दोन्ही रुपात पहात होतो. दत्त म्हणजे श्री महाराज आणि महाराज म्हणजेच श्री दत्त. व्दैत, अद्वैत भावच नाही. अशा महान विभुतीच्या सत्संग घडणे आयुष्यात अतिशय दुर्मिळच बाब म्हणावी लागेल. कदाचित अनेक जन्माचा पुण्याचा संचय असु शकतो तेंव्हा असा योग योतो, गुरू शिवाय गती नाही म्हणुन ही सत्संग ती मला लाभली असावी अध्यात्मज्ञान हे सद्गुरू कडुनच प्राप्त होते असते आणि जीवनाला परमगती म्हणजे म्हणजे मोक्ष ही सद्गुरू कृपेनेच प्राप्त होत असते. अशा या महान विभुतीची भेट बीड शहरात झाली, हा एक योगा योगच म्हणावा लागेल, श्री महाराजांच्या आठवणीच्या संदर्भात लिहायचे म्हटले तर पुष्कळ आहे. तरी ह्यात काही ठळक असे अनुभवांचे प्रकटीकरण करीत आहे.

माणसाच्या जीवनात एक असा काळ असतो की, तो त्यात परिवर्तन घडवीत असतो त्याची कल्पना कालांतराने येत असते. बीड काही माझ गाव नव्हे अनोळख्या अशा ठिकाणी माझी बँकेतुन बीड शाखेत बदली झाली होती. साधरण १९७१ - ७२ चा तो काळ असावा, मी त्या वेळी ज्या वाड्यता राहत होतो. तसेच श्री महाराज पण राहत होते दररोजच्या भेटीत त्यांचा परिचय झाला. परंतु प्रथम भेटी पासुनच माझ्या मनांत एक वेगळा स्नेह भाव होता की, हर कुणी साधी व्यक्ती नाही. अशी माझ्या मनाची ठाम धारणा झाली होती, लहान पणा पासुनच घरात श्री दत्ताची उपासना भक्ती होती. त्यात मला इथे दत्त सांप्रदायातील विभुतीचा सत्संग आपल्याला मिळतोच याचा आनंद झाला जीवनातील एक वेगळी दिशा वेगळा मार्ग मिळाला बीड मध्येच, ते दुसरीकडे जवळच राहण्यास गेले परंतु भेटीत अंतर कधीच आले नाही. दररोज त्यांच्या दर्शनाचा लाभ होत असे याच सत्संगातुन श्री दत्त पंचपदी दर गुरूवारी करण्याचे ठरले वेळ रात्री आठ साडे आठची अशा वेळा ठरल्या श्री महाराज सरकारी नोकरीत त्या कामाच्या ताणामुळे पंचपदीची वेळ साधत आमच्या बँकेच्या वेळ जरी साडेपांच असला तरी सुद्धा साडेपाचला मी कधीच आलो नाही, तेवढच एक दीड तास तरी परमेश्वराचे नामस्मरण घडत असे. त्या वेळी महाराजांची मुले लहान होती तरी सुद्धा आमच्या बरोबर पंचपदीला बसत दोन चार जण असे पंचपदीला असु त्या वेळी अभंगाला साध्या टाळांची नंतर झांज आली त्या नंतर पेटी आली काही

वेळेला तबल्याची साथ मिळत असे त्या मुळे श्री महाराजांनी लावलेल्या अभंगाला त्या सांप्रदायीक चाली असत मी दर गुरूवारी नवीन अभंग म्हणायचा प्रयत्न करीत असे श्री महाराजांच्या प्रोत्साहना मुळे बऱ्याच वेळा गुरूवारी महामंडळातुन अभंग म्हणन्याची संधी प्राप्त झाली.

पुढे १९८२ चे सुमारास माझी बदली अंबाजोगाई शाखेला झाली मला थोडे वाईट वाटले की सत्संगाला आपण वंचित झालो पण म्हणतात ना ''जेथे जातो तेथे तु माझा सांगाती'' श्री महाराजांची बदली पण त्याच वेळी अंबाजोगाई तहसिलला झाली. तेथे पण गुरूवारचा वेगळा ग्रुप तयार झाला तेथील कृष्ण मंदिरात भान राहत नसे दोन दोन वाजे पर्यंत भजन चालायची अडीच वर्ष हा सत्संग तेथे लाभला याच काळात श्री महाराजांची अनेक ठिकाणी किर्तने होत असत किर्तनाचा वेगळाअसा एक त्यांचा वेगळा हेतु होता बऱ्याच संतावर त्याची किर्तन झाली तसेच त्याची किर्तने आकाशवाणीवर खुप गाजली लोकांनी आपल्या प्रतिक्रीया भरपुर प्रमाणात आकाशवाणीला पाठवल्या त्याच्या किर्तनाची हातोटी वेगळीच होती. सुरूवात जस जस रामकृष्ण हरी करुन पर्वरंग, किर्तनाचा आशय, दिलेल्या वेळेत करणे म्हणजे अगदी तारेवरची कसरतच म्हणावी लागेल. श्री महाराजांची उत्तम गायकी होती, पुर्वरंग हा किर्तनाचा आत्माच म्हणावा लागेल दिलेल्या वेळेत करणे अवघड कला आहे. महाराज गौळणी पण चांगल्या म्हणायचे त्याची खास गौळणी म्हणजे असे थांब की रे कान्हा । थांब की रे कृष्णा येते माघारी। जावु जरा थांब। खास अस वैशिष्ठ्य म्हणण्या मध्ये येत असते खुप रंगवीत असत.

एकदा असा प्रसंग घडला की आकाशवाणी वरील किर्तन ऐकुन एका भक्ताने श्री महाराजांच्या किर्तनाचा कार्यक्रम पुर्णा येथे आयोजीत केला, पुर्णे ला मी पण महाराजांच्या सोबत पुर्णेला रेल्वेने स्थानकावर उतरलो ठरल्या प्रमाणे तेथील मंडळाच्या माणुस तेथे आम्हाला घ्यायला आला त्याच्या बरोबर नियोजीत किर्तनाच्या स्थानी आम्ही निघालो तेव्हा रस्त्यात त्या माणसाने मला विचारले महाराज दिसत नाहीत ! आम्ही दोघे शर्ट पँटीत त्याची काय चुक; महाराज म्हटल की वेगळा पेहराव आला तो नव्हता तेव्हा त्याला म्हटले रे माझ्या बरोबर जे आहेत तेच महाराज आहेत ते किर्तन करणार आहेत. तेव्हा बाकी सर्व औपचारीकता झाल्यावर किर्तनाला रात्री साडे नऊ वाजता सुरूवात झाली. जस जस रामकृष्णाच्या गजरात हजारोच्या संख्येने लोक किर्तनात तल्लीन झाले होते अडीच तीन तास किर्तन रंगले गावकरी मंडळीही खुष झाले दुसरे दिवशी सकाळी बीडला परत ऑफीस एके आफीस सुरू अशी नेहमीची धावपळ महाराजांची होत असे त्याच्या सहज बोलण्यातुन समोरच्या व्यक्तीला उपदेश घडत असे अध्यात्म या पेक्षा काही वेगळे नाही महाराजांनी

अशा प्रकारे चर्चेतुन अनेकांचे संसारीक प्रश्न सोडवले त्यांच खास वैशिष्ठ्य म्हणजे प्रतिकुल परीस्थीतीला अनुकूल कसे करता येईल यातुन ते भक्तांना त्याचा मार्ग सुलभ करून देत असत दुसऱ्याच्या कल्याणाचा मार्ग ते नेहमी शोधीत असत परंतु स्वतः त्यानी



मनकर्णिका घाट काशी, प्रथम मंत्र उपदेश सौ.औसेकर




सहकुटुंब केदारनाथ यात्रा मातोश्री सह

आपल्या प्रश्नाकडे गांभिर्याने कमी पाहीले नाही. राक्षसभुवनच्या देवस्थानचा आणि मठाचा जिर्णोध्दार कसा करावयाचा हाच एक मोठा विचार त्याच्या मनात असे.

दत्तसंप्रादाया मध्ये उपासनेला आणि साधनेला अतीशय महत्त्व महाराजांनी दिले होते. एकदा असाच प्रसंग मी सकाळीच महाराजांच्या दर्शनाला गेलो त्यांना सांगितले, तुमचं सिलेक्शन झालं आहे जावुन या आणि तसं घडतही पण या संदर्भात मला पुढे पंधरा दिवस गाणगापुरला श्री दत्ताचे दर्शन घेवुन पुढे जावु असा विचार आला ह्या प्रमाणे मी सकळीच गाणगापुरला उतरलो तेथे एक अनोळखी व्यक्ती भेटली, पंधरा एक वर्षाची असावी तो म्हणाला चला साहेब संगमावर स्थान ते करा मी आपली बँग कपडे सांभाळतो तो काही ऐकेना शेवटी आम्ही दोघे संगमावरील दत्ताचे दर्शन घेवुन आम्ही गावातील मुख्य दत्त मंदिरात अलो मंदिरात आरती नैवद्य झाल पांच घर भिक्षा पण झाली दत्त दर्शन चांगले झाले ते पण निर्गुण पादुकांचे, दोघांनी माधुकरीचा प्रसाद बाहेर येवुन घेतला त्याने मला पण प्रसाद दिला. मी त्याची काहीच विचारपुस केली नाही. अंगावर पंचा होता तसाच माझ्या समोर उभा म्हटला बाळ सकाळ पासुन माझ्या बरोबर आहेस परंतु त्याने पैसे पण घेतले नाहीत उलट मला गावाला जायला पैसे कमी पडत होते तेव्हा बँकेत कोणी ओळखीचे नसल्याने मला तेथे पैसे मिळाले नाहीत. शेवटी त्या मुलाला मी घड्याळ दिले व ते ठेवुन कुणी पैसे देते का विचार म्हटले त्याने दोन चार ठिकाणी चौकशी केली पण व्यर्थ तेव्हां तो मुलगा म्हणाला गावांला जायला मी पैसे देतो आणि

आश्चयाची गोष्ट म्हणजे त्यानी माझे तुळजापुर पर्यंतचे तिकीट काढून जागा मिळवुन दिली म्हटल त्याला बाबा पैसे पाठवून देईन त्याला नावं विचारले तेव्हां त्याने आपले नाव दत्तात्रय नडगीरे, असे सांगितले पुढे गावी आल्यावरश्री महाराजांना घडलेली हकीगत सांगितली महाराजांनी ताडत ते म्हणाले तुम्हाला दत्त महाराजांनी बाल रुपात दर्शन दिले भाग्यावान आहात मी गाणगापुरला ठरल्या प्रमाणे मनि ऑर्डर केली पण ती परत आली की या नांवाच। इसम इथे नाही. पुढे काही दिवसांनी मी ताई महाराज (श्री महाराजांच्या मातोश्री) गाणगापुरला निघल्या मी त्याच्या जवळ काही रक्कम माधुकरी साठी दिली गुरू कृपे मुळे परमेश्वर कुठल्या रूपात दर्शन देईल कही सांगता येत नाही. अज्ञानी जीवास याची जाण नसते.

१९८६ च्या वर्षाची आठवण अखंड स्मरणात राहील अशी आहे खुप दिवसा पासुन श्री महाराजांच्या मी मागे



रामकृष्ण औसेकर, पुणे

लागलो होतो की उत्तर भारताची यात्रा करावी ती ही आपल्या सानिध्यात, शेवटी त्यांनी मनांवर घेतले, बरीच त्यांच्या नात्यातील आमच्या नात्यातील मंडळी व इतर मंडळी प्रवासाला तयार झाली, तसे बँकेतील आम्ही दोघे जण होतो, ही सभा सहकुटूंबासह सह परिवार होती. त्या वेळी माझी सत्वपरीक्षा सौ. संजीवनी व तिचे म्हसवडचे भाऊ व दोन भावजया, आमची दोन मुले दोन मुली सौ. आई आणि चूलते त्यांना आम्ही मास्तर म्हणत असु त्यांनी आपल सार आयुष्य संन्यस्थ राहून भावाचा संसार उभारलेला आणि आम्हाला घडवले त्यांचे उपकार अखंड स्मरणात राहतील असेच आहेत श्री महाराजाचे सर्व कुटूंबीया समवेत मोठे महाराज श्री अनंत बुवा महाराज व सौ. ताई महाराज पण बरोबर होते. तेव्हां उत्तर भारत यात्रा श्री महाराजांच्या समवेत घडावी अशी इच्छा होती. त्या प्रमाणे त्यांच्या कृपेने ती घडु शकली यात्रेचे वर्णन शब्दात करता येणार नाही. विशेष म्हणजे काशी क्षेत्री मनकर्णिका घाटावर सौ. संजीवनी (पत्नी) व इतर तिचे भाऊ व भाऊजयी यांना श्री महाराजांचा मंत्रोपदेश मिळाला असा विलक्षण योग दुर्मिळ असा योग आमच्या कुटूंबाला आला माणसाच्या आयुष्यात असे योग पुर्व संचिता शिवाय येऊ शकत नाहीत हे खरे तिर्थ स्थानाचा व पर्यटनाचा उद्देश ऐवढाच की शरीराला व मनाला विरंगुळा मिळावा. निसर्ग रुपी परमेश्वराचा साक्षात्कार व्हावा, व त्यातुनच परमेश्वराची भक्ती उपासना मार्ग आकळता येतो.

प्रति वर्षा प्रमाणे राक्षसभुवनला दत्त जयंती सोहळा उत्सवासाठी जात असे उत्सव पाच दिवस चालत असल्यामुळे साधकाला एक वेगळाच अनुभव प्रत्ययास येतो एका दत्त जयंतीला असा अनुभव आला उत्सव चालुच होता. पहिल्या दिवशी दत्त जन्माचे किर्तन श्री महाराजांनीच केले प्रसाद दर्शन झाल्या नंतर श्री महाराज दत्त मंदिराच्या गाभाऱ्यातुन गेले मी मंदिराच्या वरती बसुन सर्व सोहळा पहात होतो. मंदिरात श्री महाराज भक्तांना अनुग्रह देत होते. आणि अचानक त्यांनी मला मंदिरात खाली सोडण्यासाठी एका भक्ताने सांगितले, मला काहीच लक्षात येईना मी मंदिरात गेलो दत्त दर्शन घेतले नी महाराजांचे दर्शन घेतले आणि त्यांनी मला अनुग्रहित केले. अनेक साधक गुरुंच्या शोधात असतात. गुरुकृपा झाली। ईमारत फळा आली ।। असा हा दुर्मिळ लाभ ह्या दिवशी झाला. दत्त उपासना म्हणा, पुर्ण संचित म्हणा असा योग भाग्यानेच येतो असे मला वाटले, मला धन्यता वाटली संत दर्शनी हा लाभ। पद्म नाभ जोडीला ।। अशी अवस्था झाली.

पुढे असेच एके दिवशी श्री महाराजांशी चर्चा चालु होती त्या संदर्भात श्री महाराज म्हणाले दत्तच तुमच्याकडे येत आहे, आणि तसे घडले पण, मी ज्या कॉलनीत राहत होतो. तेथे घराच्या बाजुलाच दत्त मंदिर उभारले, दत्त मुर्तिच्या प्राण प्रतिष्ठेसाठी मोठे महाराज श्री अनंत बुवा महाराज होते. आणि इतर दत्त संप्रदायातील अनेक महाराजांच्या सानिध्यात दत्त मुर्तिचा प्रतिष्ठापना चा सोहळा संपन्न झाला. आज या स्थापनेला दत्त जयंतीला पंचवीस वर्ष पुर्ण होतील, आता ईथला दत्त जन्म प्रति वर्षाप्रमाणे होत असे त्यामुळे राक्षसभुवनला दत्त जयंतीला जाता येईना, तेव्हा श्री महाराजांनी कॉलनीतल्या दत्ताचा उत्सव साजरा करण्यास परवानगी दिली. तरी पण राक्षसभुवनच्या पाच दिवसाच्या सोहळ्यात मी एकदा दत्त दर्शन आणि महाराजांचे दर्शन घेऊन येत असे. असे अनेक दुर्मिळ असे योगायोग श्री महाराजांच्या कृपेमुळे जीवनात घडून गेले. गुरु पासून मिळालेली फायदेशीर प्रेरणा हीच जिवनाचा मार्ग शोधत असते. आजच्या कलीयुगात अनेक गुरु अस्तित्वात आढळते. परंतु प्रेरक, सुचक, वाचक, दर्शक, बोधक या प्रकारात बोधक गुरु सर्व श्रेष्ठ मानला जातो, ज्ञानेश्वरांनी म्हटलेच आहे साधु बोध झाला। तो गुरुनिसा ठेवा। ठाईच मुरला अनुभवे ।।

काळ जसा, जसा पुढे सरकत जातो तसं माणसाच्या जीवन जगण्याच्या दिशा पण बदलतात बँकेतुन निवृत्ती नंतर मुलांच्या नोकऱ्या पुण्यात असल्याने त्या निमीत्ताने आम्ही पुण्यात स्थाईक झालो. तत्पुर्वीच २००१ च्या आधि पासुनच सौ. ची प्रकृती बिघडत गेली. अनेक उपचार चालूच होते. श्रीगुरु महाराज त्यांच्या परिने सर्व प्रयत्न करीतच होते इथे पुण्यात २००८ च्या सुमारास पुण्याच्या हॉस्पीटल मध्ये उपचार घेतले पर औषधांना तेवढा प्रतिसाद मिळत नव्हता, आजार बळावत चालला, तसेच श्री महाराजांच्या प्रकृती स्वास्थामुळे दुरचा प्रवास करणे अवघड झाले होते आणि सौ.ना सतत श्री. महाराजांच्या दर्शनाची ओढ लागली होती. भेट व्हावी म्हणुन मी सतत फोनवर सांगत होतो. की त्या सतत चिंतनाने एके दिवशी गुरु महाराज गाडी कडुन सहकुटूंब भेटी साठी आले. श्री महाराजांनी कृपा कटाक्षाने तिला पाहीजे त्यात एक वेगळी भक्ती जाणवली त्यावेळी तिने श्री महाराजाचे दर्शन घेतले. तिला श्री महाराजाने चारधामाचे तिर्थ दिले. अंगारा दिला, प्रसाद दिला तो गुरुवारचा दिवस होता. तिला ते शेवटचेच दर्शन महाराजांनी दिले असे म्हणावे लागेल. माझे एकच दिवस गेला. मनाची आणि शरीराची स्थिती बिघडली आणि ती पंचत्वात विलीन झाली. उत्तर भारत यात्रा जशी महाराजांच्या सानिध्यात झाली तशी दक्षिणेकडील घडावी असा अनेक वेळा वाटलं. पण तसा योग आला नाही याची खंत तिच्या मनात राहुन गेली.

शेवटी एवढच म्हणायचं आहे की प्रपंच जरी कर्मस्थ असला तरी घृण्य आहे म्हणुन देहाला धरुन आहे. मग वासना, भय, अदृश्य स्वरुपात आणि सुक्ष्म आहे. म्हणुनच अनुसंधान साधकासाठी देह धरावा. प्रपंचातील कमीला आणि मन पाहणे गुरुचरणाला

भगवंताच्या नामस्मरण गुर कृपेची अखंड स्मृती जागृत ठेवली तर कुणालाही समाधानाची प्राप्ती होऊ शकते. ईश्वराकरीता श्रध्दा दृढ असावी आणि सदाचरण या दोन मुल्यावाचून जिवनाला पुर्तता होऊ शकत नाही. जीवनात ईच्छित मार्ग साध्य करण्यासाठी संताची संगत आणि भगवतांचे नामस्मरण हे दोनच उपाय प्रापंचीकाला या संसार रुपी भव सागरातुन तारुन नेणारे आहेत. असे श्री महाराजांनी उपदेशपर सांगणे असे, म्हणुनच हरीपाठात श्री ज्ञानेश्वरांनी म्हटलेच आहे ते पुढील प्रमाणे

संताचे संगती। मनो मार्ग गती ।।
आकळावा श्रीपती येणे पंथी ।।

श्री महाराजांच्या अखेरच्या पर्वात यांच्या प्रकृती स्वास्थामुळे त्यांचा बाहेरचा संपर्क कमी झाला महाराजांच्या भेटीसाठी आणि दर्शनासाठी माणसं सारखी येतच असत आपली प्रापंचीत दुखः सांगत काहीतरी मार्गदर्शन मिळवण्यासाठी येत असत. काही परमार्थ सांगण्यासाठी लोक महाराजांकडे येत असतात. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत महाराजांनी सर्वांना मार्गदर्शन केले नेहमी माणसाच्या सानिध्यात सदैव रमलेले श्री महाराज शेवटीही त्याच गराड्यात होते. परंतु हे अनादी, अनंत, सद्गुरु स्वरुपी विलीन झाले तो नेमका क्षण त्यांनी सर्वांना आपल्या मायेने चुकवुन एकट्यानेच अनुभवला तो दिवस होता माघ कृ. २ बुधवार दि. ११ फेब्रुवारी २००९ ते ब्रह्मस्वरुपात विलीन झाले.

एक चैतन्य सूर्याचा अस्त जाहला

असा ह्या श्री महाराजांच्या अनेक आठवणी अखंड अशा स्मरणात राहतील श्री महाराजांना आपण स्मृतीगामी असे म्हटले तरी वावगे होणार नाही. सद्गुरुने पुढील कार्य त्यांच्या आवतार समाप्ती नंतर गुरुपरंपरेने समर्थपणे पुढे नेण्याचे ते वर्धिष्णु करण्याचे असे दुसरे उदाहरण सापडणे कठीण आहे. म्हणुनच शेवटी असे म्हणावे लागते.


म्हणती गुरु त्याला । चालवीती सांप्रदाय आपला असे आमचे श्री महाराज अखंड स्मृतीगामी राहतील.

***

# नाग सुंदरम उर्फ एन सुंदरम...

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

एन सुंदरम हे मूळचे तामिळनाडूमधील होते. आझाद हिंद सेनेमध्ये सामील होण्यापूर्वी ब्रम्हदेश प्रदेशामध्ये (म्यानमार) रंगून येथे एक लहानसे दुकान चालवत होते. त्यांनी आझाद हिंद सेनेत प्रवेश केला. १९४४ मध्ये आझाद हिंद सेनेच्या क्षेत्र प्रचार समितीचे एक सैनिक म्हणून त्यांनी सक्रीय भूमिका बजावली. या समितीचा मुख्य उद्देश तामिळ भाषिक भागातील लोकांमध्ये आणि भारतामध्ये सर्वसामान्य जनतेमध्ये आझाद हिंद सेनेच्या विचारांचा प्रसार करणे व उद्दिष्ट लोकांपर्यंत पोहचविणे असे होते. एन. सुंदरम यांनी मार्मो मार्गे मणिपूर मध्ये आणि पर्यायांने भारतामध्ये प्रवेश केला आणि स्थानिक जनतेचे समर्थन मिळविण्यासाठी मदत केली. एन. सुंदरम यांची जबाबदारी शत्रूच्या बाजूने काही वेळ घालवणे, मोहीम चालवणे तसेच आझाद हिंद सेनेच्या धर्मादि विचारांचे प्रचारकाम करणे हे होते. त्याकाळात मणिपूरमध्ये आझाद हिंद सेनेची विविध कृत्ये सुरू होती. ज्यात नैतिक पाठबळ वाढविणे, स्थानिकांमध्ये स्वातंत्र्यलढ्यासाठी जागरुकता निर्माण करणे, तसेच शत्रूच्या हालचालीवर नजर ठेवणे प्रमुख होते. एन. सुंदरम यांनी या सर्व प्रेरक कार्यात विशेष योगदान दिले. त्यांच्या व इतरांच्या कष्टामुळे आझाद हिंद सेनेला स्थानिक सहकार्य आणि समर्थन मिळविणे शक्य झाले. एन सुंदरम हे फक्त सैनिक नव्हते तर धोरणात्मक प्रचाराचा आणि राजकीय संवादाचा भाग होते. त्यांनी त्यांच्या लष्करी कार्यात धोरणात्मक मोहीम राबविण्यासह सामाजिक नेटवर्कचा आधार घेत जनतेच्या मनात स्वातंत्र्यचळवळीबद्दल आत्मविश्वास वाढविला. स्वातंत्र्यसैनिक म्हणून पराक्रम आणि नेतृत्वाच्या कौशल्याशी त्यांनी आपले वेगळेपण रंगून ते मणिपूर भागात दाखविले. आझाद हिंद सेनेच्या नेताजी यांच्या आदेशाप्रमाणे महंमद कयानी यांनी १० जुलै १९४४ रोजी आदेश दिल्याप्रमाणे एन सुंदरमही अतिशय कष्टपूर्वक आझाद हिंद सेनेबरोबर रंगूनला परतले. ६ सप्टेंबर १९४५ रोजी ब्रिटिशांनी सिंगापुर पुन्हा ताब्यात घेतल्यानंतर आझाद हिंद सेनेच्या सर्व सैनिकांना कैद करून रंगूनच्या कारागृहात ठेऊन नंतर त्यांची रवानगी




कलकत्त्याच्या कैदेत करण्यात आली. ब्रिटिशांच्या आदेशाप्रमाणे १९४६ मध्ये आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना टप्प्याटप्प्याने मुक्त करण्यात आले. एन सुंदरम यांनी आपले पुढील आयुष्य १९४६ पासून नेताजी भवन आणि




नेताजी रिसर्च ब्यूरो सेंटरसाठी वाहून घेतले. १९७२ रोजी शिशिर बोस, कृष्णा बोस यांच्याबरोबर मोईरंग येथे नेताजी यांच्या स्मारकाच्या उद्घाटनासाठी एन. सुंदरम हे कलकत्त्याहून २८ वर्षांनी गेले होते. या ठिकाणी नेताजी यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी राष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी तसेच नेताजी यांच्या कुटुंबियांना आमंत्रीत करण्यात आले होते. या दौ-याच्यावेळी शिशिर बोस हे जिथे जिथे आझाद हिंद सेने चा ३ महिने १९४४ साली ताबा होता त्याठिकाणी गेले व आझाद हिंद सेनेच्या सैनिकांच्या व ज्यांना नेताजी भेटले होते त्यांच्या त्यांनी गाठी घेतल्या. त्यांच्याबरोबर एन सुंदरम होते. हे सर्वजण मोरेहला जाण्यापूर्वी थोडा वेळ तेंगनौपालला थांबले होते. त्यावेळी तेंगनौपालमध्ये खूप धुकं होतं. ते गाव बघून कृष्णा बोस यांना दार्जिलिंग जवळच्या कुर्सेओंगची थोडीशी आठवण आली. या दोन्ही गावांची उंची सारखीच म्हणजे ४९०० फूट आहे.

मोरेह हे एक गजबजलेल व्यापारी गाव आहे. हे सर्वजण तिथं १९७२ साली लोकचो नदीच्या काठी उभे होते. भारत आणि ब्रम्हदेश (म्यानमार) यांच्या सरहद्दीची ती खूण आहे. तामू हे ब्रम्हदेशातील गाव सीमारेषेला लागून पलीकडेच आहे. नेताजी रिसर्च ब्यूरोचे त्यावेळी पूर्णवेळ कर्मचारी असलेले एन. सुंदरम यांनी शिशिर बोस यांना नदीकाठचं, खडकांच्या राशीजवळील एक ठिकाण दाखविले. तिथं त्यांची छावणी १९४४ साली वसवलेली होती. एन. सुंदरम आणि त्यांचे सहकारी नदीत मच्छरदाण्या टाकून मासे पकडत अशी आठवण त्यांनी सर्वांना सांगितली. पकडलेले मासे शिजवून ते उकडलेल्या गवताबरोबर खात. लोकचो नदीच्या पुलावर उभं राहून खाली बघीतले तेव्हा कृष्णा बोस यांना दुस-या महायुद्धात उध्वस्त झालेल्या जुन्या पुलाचे काही अवशेष त्यावेळी दिसले जे नदीच्या तळाशी ऋतून बसलेले आहेत. मंहमद कियानी यांनी आपल्या आठवणींमध्ये असं लिहिलं आहे की, माघार घेणा-या आझाद हिंद सेनेच्या फौजेने जुलै १९४४ च्या उत्तरार्धात मोठ्या कष्टाने लोकचाओ नदी ओलांडली. कारण मान्सूनच्या पावसामुळे नदी दुथडी भरून वाहत होती. एन. सुंदरम यांच्या कहाण्या ऐकून मोरेहम येथील सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) जवान थरारून गेले होते. आझाद हिंद सेनेचा वारसा आजही भारतातील विविध स्मारक संग्रहालय शाळा महाविद्यालयांमध्ये जतन केला जातो. आझाद हिंद सेनेच्या सर्व सैनिकांच्या बलिदानाला राष्ट्रीय इतिहासात महत्वाचे स्थान प्राप्त आहे. यातीलच एक महत्वाचे नांव म्हणजे नाग सुंदरम (एन. सुंदरम)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559